आम्हाला खरचं नकोय आमच्या देशाचा पंतप्रधान
एक आत्मगौरवमग्न राक्षस!
ते म्हणतात आमचे पंतप्रधान आमच्या धर्माचे रक्षण करतात.
नको, तशी काहीच गरज नाही...
आजवर कोणत्याही धर्माने केलेला नाही लोकांचा उद्धार...
त्यासाठी आम्हाला खरचं धर्माची गरज नाहीये...
लोकांना काय हवंय
तर हाताला काम आणि प्यायला पाणी
तहान भागवायला पाणी आणि श्रम करायला काम.
आणि हवंय लोकांना छानसं गांव शांततेनं रहायला...
लोकांना हवंय अन्न, वस्त्र, निवारा आणि ज्ञान...
कामच असते कामगारांचा धर्म...
त्यांना नको कोणता शुष्क धर्म...

प्रेमधर्माच्या पथावर अनवाणी पावलांनी चालणारा
एखादा बौद्ध भिक्खू असावा
आमचा पंतप्रधान!
आजच्या बौद्ध पौर्णिमेचा शितल चंद्रप्रकाश उजळून
टाको तुमचं आमचं जीवन!



## स्नेहजासाठी...

स्वप्न आणि कलहाचे काटे सोडवून
कुठं निघून गेलीस तू
कुणाच्या हाकेला ओ दिलीस इतक्या आर्तपणे
खिसेकापूनं कापावा खिसा अज्ञात
तसा खुडून नेला तुझा कोमल हसरा प्राण
आठवणींचं सांगू नकोस मला
चांदण्यासारख्या त्या दूर चमचमतात
आपल्या शरिरावर जळता अंधार फेकत रहातात
थकलेय मी असं पण आपण दुःखाला
न मरणांना म्हणू शकत नाही
या भयंकर वळणांवर
आपण निवडुंगाला बहरून आलोय
की आपण ग्रीष्मच आहोत
हेदेखील कळेनासं होतं
हेच कळलं फक्त
तू एक देखणं पारिजातकाचं झाड होतीस
तुझं जास्वंदी हसणं
निर्माल्य होणार नाही
एवढंच मी सांगू शकतेय...

**मलिका अमर शेख**
मुंबई